महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक/नाविमं/प.मा./1548
दिनांकः 20/05/2025

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क अधिकारी,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

विषयः— फेब्रुवारी/मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.
संदर्भः— राज्य मंडळ पत्र क. रा.मं./परीक्षा—2/1746 दि. 20/05/2025.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रास अनुसरून सादर करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10 वी) फेब्रुवारी/मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू

(श्रीमती ज्योती जाधव)
विभागीय सहा. सचिव, (प्र.)
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सहपत्रः—प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे—4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून द्यावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै...............................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्रकटन।।

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या गुणपत्रिका व इतर साहित्य वाटपाबाबत.

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर दिनांक १३/०५/२०२५ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या गुणपत्रिका व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना **सोमवार दिनांक २६/०५/२०२५** रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून माध्यमिक शाळांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना सूचित करण्यात आलेले आहे.

याबाबत विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित मुख्याध्यापक/विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- २०/०५/२०२५